## अनुक्रमाणिका


| | |
|---|---|
| **भाग – अ** | ३ |
| **विभाग १ ...** | ३ |
| अनिवासी विनिमय गृहांच्या रुपये व्होस्ट्रो खात्यांची कार्यरीत | ३ |
| **विभाग – २** | ६ |
| मंजुरीप्राप्त व्यवहार | ६ |
| **विभाग -३** | ७ |
| रुपये निकासीची व्यवस्था – कार्यरीती व गहाणवट | ७ |
| **विभाग – ४** | ११ |
| विदेशी मुद्रांच्या निकासीची व्यवस्था | ११ |
| विभाग ५ | १२ |
| संकीर्ण तरतुदी | १२ |
| **विभाग - ६** | १३ |
| अंतर्गत नियंत्रण व खात्यांवर देखरेख | १३ |
| **भाग ब** | १४ |
| रिपोर्टस/विवरणपत्रे | १५ |
| **जोडपत्र १** | १६ |
| विनिमय गृहांमधील रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांमध्ये भाग घेण्याची परवानगी मिळविण्यासाठी अर्ज - | १६ |
| **जोडपत्र २** | २१ |
| विवरणपत्र अ | २१ |
| **जोडपत्र ३** | २३ |
| विवरणपत्र ब | २३ |
| **जोडपत्र ४** | २४ |
| विवरणपत्र क | २४ |
| **जोडपत्र ५** | २५ |
| विवरणपत्र ड | २५ |
| **जोडपत्र ६** | २७ |
| विवरणपत्र ई | २७ |
| **परिशिष्ट** | २९ |

## भाग अ

### विभाग १

<u>अनिवासी विनिमय गृहांच्या रुपये व्होस्ट्रो खात्यांची कार्यरीत</u>

(१) प्रस्तावना

अनिवासी विनिमय गृहांच्या भारतामधील, रुपये/विदेशी मुद्रेतील व्होस्ट्रो खाती उघडण्यास व ठेवण्यास प्राधिकृत डीलर वर्ग १ बँकांनी रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. भारतामध्ये, विदेशी विनिमय गृहांची, रुपये/विदेशी मुद्रेतील व्होस्ट्रो खाती उघडण्या-ठेवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत

(२) (अ) रुपी ड्रॉईंग ( आरडी ९ ) खाली, आखाती देश, हॉंगकॉंग व सिंगापूर येथे असलेल्या विनिमय गृहांमधून भारतात क्रॉस बॉर्डर अंतर्गत प्रेषण केले जाते. भारतामधील ह्या विनिमय गृहांची रुपयांमधील व्होस्ट्रो खाती उघडण्यास व ठेवण्यास रिझर्व बँकेच्या पूर्व मंजुरीची आवश्यकता असते. आखाती देश, हॉंगकॉंग व सिंगापूर येथील अनिवासी विनिमय गृहांची भारतामध्ये रुपये व्होस्ट्रो खाती उघडण्यास व ठेवण्यास, एडी वर्ग १ बँकांनी, आवश्यक त्या कागदपत्रांसह, **जोडपत्र-१** मध्ये दिलेल्या फॉर्ममध्ये, रिझर्व बँकेकडे अर्ज करावा.

(ब) ह्या महापरिपत्रकात भारतामधील अनिवासी विनिमय गृहांची, रुपये व्होस्ट्रो खाती उघडणे व ठेवणे ह्यासंबंधाने असलेल्या निरनिराळ्या तरतुदी देण्यात आल्या आहेत.

(३) **सर्वसाधारण सूचना**

(अ) भारतामध्ये एक विनिमय गृह उघडण्याबाबतच्या विनंतीचा विचार करताना संबंधित एडी वर्ग १ बँकांनी, नेहमीच्या बँकिंग रीतीनुसार, त्या विनिमय गृहाच्या आर्थिक परिस्थितीबाबत आवश्यक त्या चौकशा कराव्यात आणि सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करुन घ्यावे. एडी वर्ग - १ बँकांनी खात्री करुन घ्यावी की, अशा विनिमय गृहांनी, स्थानिक नाणेविषयक/पर्यवेक्षणीय, संबंधित अशा प्राधिकरणांकडून वैध परवाने घेतले असून त्यांच्याकडे चलन विनिमय/धन हस्तांतरणाचे व्यवहार करण्यासाठी आवश्यक ते प्राधिकरण/परवाने आहेत.

(ब) रुपये निकासी व्यवस्था/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था ह्याखाली, एडी वर्ग १ बँका व विनिमय गृहे ह्यादरम्यानचा करार पंजीकृत करण्याची आवश्यकता ऐच्छिक ठेवण्यात आली आहे. तथापि, असे करारनामे काटेकोरपणे कायद्याने आवश्यक अशा कागदपत्रांद्वारे केले जावेत आणि एडी वर्ग - १ बँकांनी, ह्याबाबत सर्व कायदेशीर बाबी पूर्ण कराव्यात. ह्याशिवाय, ह्या करारनाम्याखाली त्या विनिमय गृहांचे सर्व भागीदार, संयुक्तपणे व एकत्रितपणे त्या ग्रहावरील जबाबदाऱ्या पूर्णपणे निभावणारे असल्याची खात्री करुन घेण्यात यावी.

(क) मुखत्यार नामा अधिकाऱ्यांच्या नमुना सह्यांचे पंजीकरण अशा नेहमीच्या बँकिंग आवश्यकता इत्यादींचे पालन केले जावे.

(४) **रुपये व्होस्ट्रो खात्यामधील कार्यरीतींबाबतच्या सूचना**

(अ) मूलतः खाजगी खात्यावरील भारतात क्रॉस बॉर्डर इनवर्ड प्रेषण करण्यासाठी ह्या खात्यांचा उपयोग केला जाऊ शकतो. काही अपवाद सोडल्यास, प्रेषक व लाभार्थी ह्या व्यक्ती असाव्यात. विनिमय गृहांद्वारे व्यापारी व्यवहारांना अर्थसहाय्य रु. २,००,०००/- ( रुपये दोन लक्ष ) प्रतिव्यवहार करण्यास परवानगी आहे. ***ह्या खात्यांचा उपयोग, भारतामधून सरहद्दीच्या बाहेर प्रेषण करण्यासाठी केला जाऊ नये.***

(ब) ही खाती क्रेडिट धर्तीवर चालविली जावीत. खातेदारांना कोणताही ओव्हरड्राफ्ट दिला जाऊ नये. तथापि, डेसिग्नेटेड डिपॉझिटरी एजन्सी ( डीडीए ) च्या बाबतीत, तशीच आवश्यकता भासल्यास, त्या डीडीएच्या खात्यात असलेली रक्कम हिशेबात घेतली जावी. पुरेसा निधी असल्याची तपासणी करण्यासाठी व छुपे ओव्हरड्राफ्ट्स ओळखण्यासाठी, जेथे रुपये व्होस्ट्रो खात्यात ड्रॉवी बँकेत प्रदान केले गेले असल्यास, रियल टाईम बेसिसवर ऑन लाईन डेबिट करणे शक्य नसेल तेथे एडी वर्ग - १ बँकांनी व्हॅल्यु डेटिंगचा वापर करावा. तथापि, अशा बाबतीत अशा ड्रॉवी बँका लौकरात लौकर नेटवर्कद्वारे जोडल्या जाण्याची खात्री करुन घ्यावी.

(क) प्रत्येक व्यवस्थेसाठी एक वेगळे रुपये व्होस्ट्रो खाते ठेवले जावे आणि ते खाते, ठेवणाऱ्या एडी वर्ग १ बँकेला, परवानगी प्राप्त विदेशी मुद्रा विकून आलेल्या निधीने ठेवले जावे. दुसऱ्या एखाद्या एडी वर्ग १ बँकेमधून किंवा दुसऱ्या एखाद्या व्होस्ट्रो खात्यामधून हस्तांतरित झालेला रुपयातील निधी त्या खात्यात जमा केला जाण्यास पात्र असणार नाही.

(ड) परवानगी प्राप्त असलेल्या इनवर्ड प्रेषणाचे डेबिट ( वरील ४ (अ) अनुसार ) मुक्तपणे केले जावे आणि त्याला, मंजुरीप्राप्त रितीने भारतात केलेल्या प्रेषणांचा दर्जा दिला जावा. अशा प्रकारे, अशी प्रदाने, अनिवासी भारतीयांनी ठेवलेल्या अनिवासी ( बाह्य ) रुपये खात्यात जमा करण्यास किंवा प्रायोरिटी ॲलॉटमेंट इत्यादि योजनांखाली स्वीकार करण्यास पात्र असतील. अशा खात्यांतून प्रेषणे मिळविण्याची सुविधा पर्यटकांना ( भारतीय असोत किंवा नसोत ) मिळण्यास मदत होण्यासाठी, आवश्यक तेथे त्या निधींचा बाह्य स्रोत सिध्द करण्यासाठी, ( भारतात येण्याचा प्रवास खर्च किंवा न वापरलेल्या शिलक्केचे पुनर् रुपांतरण ) अशा खात्यांतून प्रेषण मिळण्यासाठी, एडी वर्ग १ बँका, विदेशी बँकांच्या रुपये खात्यांमधून इनवर्ड प्रेषण मिळविण्यासाठी असलेल्या स्वरुपातच प्रमाणपत्रे देऊ शकतात.

(ई) अशा खात्यांमधील निधी रुपांतरणीय नसतील तसेच अन्य एडी वर्ग - १ बँकेत किंवा त्याच एडी वर्ग - १ बँकेत ठेवलेल्या इतर अनिवासी खात्यात हस्तांतरणीय नसतील.

(फ) अशा खात्यांमधील शिलकांमधून व्याज देता येणार नाही.

(ग) विनिमय गृहाचे रुपये व्होस्ट्रो खाते ठेवणाऱ्या एडी वर्ग १ बँकेच्या शाखेने, त्या विनिमय गृहाने खरेदी केलेले रुपये, त्या एडी वर्ग १ बँकेच्या खात्यात विदेशी मुद्रेच्या सममूल्य विदेशी मुद्रा जमा झाल्याबाबत दुजोरा मिळेपर्यंत त्या खात्यात जमा करु नये. ( तुलना करा – विदेशी मुद्रा व्यापारावरील नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्वे, डिसेंबर १९९६ चा परिच्छेद ३.३.१ ).

(ह) कर्ज व कार्यकारी जोखमींबाबत, एडी वर्ग १ बँका, कोणत्याही परिवर्तनीय विदेशी मुद्रेच्या स्वरुपात किंवा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेच्या हमीच्या स्वरुपात ( व्यवस्थेच्या प्रकारानुसार ) योग्य व पुरेसे तारण मिळवू शकतात.

(आय) एडी वर्ग - १ बँकेच्या एखाद्या विनिमय गृहाशी असलेल्या जोडणीसाठी रिझर्व बँकेची मंजुरी असणे आवश्यक आहे. एक प्रुडेंशियल उपाय म्हणून, रिझर्व बँकेने, अशा व्यवस्थांच्या संख्येवर २० आणि अशा ड्रॉवी शाखांच्या संख्येवर ३०० अशी मर्यादा घातली आहे. तथापि, व्होस्ट्रो खात्यातील छुपे ओव्हरड्राफ्ट्स टाळण्यासाठी, जोखीम व्यवस्थापन प्रणाली व निधींची ऑनलाईन देखरेख उत्तम असलेल्या एडी वर्ग - १ बँकांसाठी, ही मर्यादा रिझर्व बँकेकडून २० पलिकडेही शिथील केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे, व्होस्ट्रो खात्यातील छुपे ओव्हरड्राफ्ट्स टाळण्यासाठी, निधीची ऑनलाईन देखरेख उत्तम असलेल्या व कोअर बँकिंग सोल्युशन असलेल्या डेसिग्नेटेड ड्रॉवी बँकांची संख्याही, ३ एडी वर्ग - १ बँका, ३००च्या वर ठेवू शकतात. मात्र, ह्यासाठी अशा विनिमय गृहाच्या टायअपसाठी रिझर्व बँकेच्या मंजुरीमधील अटी व शर्ती तसेच रिझर्व बँकेने, आरडीए संबंधाने वेळोवेळी दिलेल्या सूचना लागु होतील. एडी वर्ग १ बँकांनी, त्यांच्या ड्रॉवी बँकांची संख्या ३०० च्या वर वाढविण्यापूर्वी, त्यांच्या संचालक मंडळाची मंजुरी घ्यावी व त्याबाबतची स्थिती रिझर्व बँकेला ताबडतोब कळवावी.

**विभाग २**

**मंजुरीप्राप्त व्यवहार**

विनिमय गृहांबरोबर असलेल्या निकासी व्यवस्था ह्या मूलतः सरहद्दीपलिकडील अंतर्गत व्यक्तिगत प्रेषणे करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. ***कोणत्याही परिस्थितीत, देणग्या/धर्मादाय संस्थांना द्यावयाच्या वर्गण्या विनिमय गृहाद्वारे पाठविल्या जाऊ नयेत.*** विनिमय गृहांबरोबर निकासी व्यवस्थांखाली करण्यास परवानगी असलेल्या व्यवहारांची यादी खाली दिली आहे

(१) अनिवासी भारतीयांनी रुपयांच्या स्वरुपात ठेवलेल्या अनिवासी ( बाह्य ) रुपये खात्यात क्रेडिट

(२) अनिवासी भारतीयांच्या कुटुंबांना प्रदान

(३) हप्ते/गुंतवणुक ह्यासाठी विमा कंपन्या/म्युच्युअल फंड/पोस्ट मास्तर ह्यांच्या नावे केलेले प्रदान

(४) शेअर्स, डिबेंचर्समध्ये गुंतवणुक करण्यासाठी बँकर्सच्या नावाने केलेले प्रदान

(५) वैय्यक्तिक नावाखाली, भारतामधील निवासी घरे मिळविण्यासाठी, सहकारी गृहनिर्माण संस्था, सरकारी गृह-योजना किंवा इस्टेट डेवलपर्स ह्यांना झोल्लेले प्रदान

(६) शाळा, कॉलेजे, आणि इतर शैक्षणिक संस्थांना शिक्षण/बोर्डिंग, परीक्षा शुल्क ह्यासाठी प्रदान

(७) एनआरआय/ह्यांच्यावर अवलंबून असलेले आणि भारतात राहणारे आखाती देशातील नागरिक ह्यांच्या औषधोपचारासाठी, वैद्यकीय संस्था, व इस्पितळांना केलेले प्रदान

(८) आखाती देशाच्या नागरिकांनी/एनआरआयनी त्यांच्या राहण्यासाठी हॉटेलांना केलेले प्रदान

(९) एनआरआय व त्यांची भारतात राहणारी कुटुंबे ह्यांच्या भारतामधील, देशांतर्गत विमान कंपन्यांद्वारा प्रवासासाठी प्रवास-एजंटाना केलेले प्रदान.

(१०) प्रति व्यवहार रु. २,००,०००/- ( रु. दोन लक्ष ) पर्यंतचे व्यापारी व्यवहार.

***सूचना : रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थेखाली मिळालेल्या प्रेषणासाठी रोख रक्कम दिली जाणार नाही.***

**विभाग – ३**

<u>**रुपये निकासी व्यवस्थेची कार्यरीत व तारणाचे संरक्षण**</u>

डेसिग्नेटेड डिपॉझिटरी एजन्सी ( डीडीए ), नॉन डेसिग्नेटेड डिपॉझिटरी एजन्सी ( नॉन डीडीए ) आणि स्पीड रेमिटन्स रीतींखाली रुपये निकासी व्यवस्था चालविल्या जाऊ शकतात.

(१) **डेसिग्नेटेड डिपॉझिटरी एजन्सी ( डीडीए ) कार्यरीत**

(अ) विनिमय गृहाला, ड्रॉवी बँकेच्या नावे, त्या बँकेला स्वीकार्य असलेल्या एका आंतरराष्ट्रीय बँकेत, दोन्ही पक्षांना संमत असलेल्या केंद्रात किंवा त्या त्या ड्रॉवी बँकेतच, जेथे रुपये व्होस्ट्रो खाते ठेवले आहे त्या शाखेत रिझर्व बँकेच्या पूर्व मंजुरीने, विदेशी मुद्रेत एक बँक खाते उघडावे लागेल ( डीडीए खाते )

(ब) प्रत्येक दिवसाच्या अखेरीस, विनिमय गृह, त्या दिवसामध्ये, भारतीय रुपयात झालेली निकासी काढील आणि त्या रक्कमेचे विदेशी मुद्रेत रुपांतर करील व अशी रक्कम, पुढील दिवसाच्या दुपारपर्यंत ड्रॉवी बँकेच्या खात्यात ( खाते – विनिमय गृह ) जमा करील ( वर १(अ) मध्ये वर्णन केलेले डीडीए खाते ).

(क) विनिमय गृह, ड्रॉवी बँकेला, काढलेल्या ड्राफ्ट्सची एकूण रक्कम व संख्या आणि डीडीए खात्यातील रोजची जमा ह्यांची माहिती कळवील. डीडीए खात्यातील हस्तांतरण शक्यतो वारंवार केले जावे व त्याला खाली १(ई) मधील अट लागु आहे.

(ड) हा निधी ड्रॉवी बँकेच्या लीएनच्या खाली डीडीए खात्यात ठेवला जाईल. ह्या डीडीए खात्यातून करता येणारे परवानगीप्राप्त डेबिट्स म्हणजे – (१) जेथे ड्रॉवी बँक सोडून अन्य बँकेत डीडीए खाते ठेवले आहे अशा ड्रॉवी बँकेच्या नोस्ट्रो खात्यामध्ये करावयाचे हस्तांतरण. (२) जेथे ड्रॉवी बँकेत डीडीए खाते ठेवले आहे त्या बँकेला परवानगीप्राप्त विदेशी मुद्रा विकून विनिमय गृहाच्या रुपये व्होस्ट्रो खात्यात क्रेडिट करण्यासाठी

(ई) कोणत्याही दिवशी गोळा केलेली रक्कम हस्तांतरित करण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी विनिमय गृहाचीच असेल. डीडीए खात्यातील निधीसाठी असलेला फ्लोट पिरियड, ड्रॉवी बँकेद्वारे विनिमय गृहाशी सलजमसलत करुन ठरविला जाईल व तो कमाल **पाच दिवसांचा** असेल.

(फ) वरील १(ब) अनुसार विनिमय गृहाने डीडीए खात्यात ठेवलेल्या रकमेवरील, ड्रॉवी बँकेमधील नोस्ट्रो खात्यात हस्तांतरित होण्याच्या तारखेपर्यंत मिळालेले व्याज विनिमय गृहाकडे उपवर्जित केले जाईल.

(ग) वरील सूचनांचे अनुपालन होत असल्याची खात्री करुन घेण्यासाठी, भारतामधील ड्रॉवी बँक, डीडीएमधील दैनंदिन निकासी व ठेवी तसेच ड्रॉवी बँकेच्या नोस्ट्रो खात्यात केलेले हस्तांतरण ह्यांची तपासणी करण्यासाठी, संबंधित देशात कार्यरत असलेल्या, कार्यकारी चार्टर्ड अकाऊंटंट्स/ऑडिटर्सच्या एका कंपनीची नेमणुक करील.

ह्यासाठी, विनिमय गृह अशा ऑडिटर्सना त्याच्या पुस्तकांची, पे-इन पावत्या इत्यादींची तपासणी, रुपये निकासी संबंधात करु देईल. ऑडिटर्सद्वारा अशी तपासणी आठवड्यातून एक ते दोन वेळा केली जाईल.

(ह) वरील परिच्छेद १(ग) मध्ये दिल्याप्रमाणे ऑडिटर्सच्या नेमणुकीला पर्याय म्हणून, एडी वर्ग-१ बँक, तिचे हितसंबंध जपण्यासाठी, तिचा प्रतिनिधी म्हणून, अशी कामे करण्यासाठी, तिच्याच योग्य अधिकाऱ्याची नेमणुक करील.

(आय) असे ऑडिटर्स/प्रतिनिधी त्यांना आढळलेल्या बाबी ड्रॉवी बँकेला ताबडतोब कळवतील. विनिमय गृहाकडून काही कसुरी झाली असल्यास, ड्रॉवी बँक, कराराच्या अटी व शर्तींनुसार, विनिमय गृहाला नोटिस देऊन एजन्सीची व्यवस्था समाप्त करील आणि अशी समाप्तीही रिझर्व बँकेला ताबडतोब कळविली जाईल.

(ज) ह्या मार्गदर्शक तत्वांचे पालन विनिमय गृह करीत असेपर्यंत दिलेले ड्राफ्ट्स उभय-संमत शाखांद्वारे पास केले जाण्याबाबत ड्रॉवी बँक खात्री करुन घेईल.

(के) ऑडिटर्सना द्यावयाचे मानधन ड्रॉवी बँकेद्वारे दिले जाईल.

(ल) विनिमय गृहाने काढलेल्या ड्राफ्ट्सची वैधता, ते दिल्याच्या तारखेपासून **तीन महिने** असेल.

(म) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकरणांची मंजुरीप्राप्त ऑडिटर्सद्वारा, विनिमय गृहाची लेखा-पुस्तके नियमित तपासली जाण्याबाबत एडी वर्ग १ बँकांनी समाधान करुन घ्यावे.

(न) एडी वर्ग-१ बँकांनी, त्यांच्या लेखा-पुस्तकातील खाते सुरु ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासाठी, विनिमय गृहाचे क्रेडिट रिपोर्ट्स, ऑडिटेड ताळेबंद आणि नफा-तोटा लेख नियमितपणे मागवावेत.

(ओ) सर्व परवान्यांच्या वैध प्रती, एडी वर्ग-१ बँकेने रेकॉर्डवर ठेवाव्यात.

(प) विनिमय गृहाच्या लेखा पुस्तकांची तपासणी करता येत नसल्याने, एडी वर्ग-१ बँकांनी विनिमय गृहाला भेटी देऊन आणि/किंवा ओपिनियन रिपोर्ट्सचे पुनरावलोकन करुन ह्या व्यवस्थेचे नियमितपणे पुनरावलोकन करावे. एडी वर्ग-१ बँकांच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटींमध्ये पुरेशा वरिष्ठ स्तरावरील अधिकारी असावेत व त्यांना, विनिमय गृहांच्या अनिवासी रुपये खात्यांसंबंधाने संपूर्ण ज्ञान असावे.

(क्यु) डीडीएसाठी तारण-संरक्षण : तीन वर्षांचा कार्यकारी काल पूर्ण न केलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणत्याही परिवर्तनीय मुद्रेमधील रोख ठेव किंवा ७ दिवसांच्या निकासींच्या सममूल्य रकमेची हमी, एखाद्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेकडून घेतली जावी. कार्याची तीन वर्षे यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणतेही तारण विहित केलेले नाही. तथापि, एडी वर्ग-१ बँका, त्यांची स्थिती सुरक्षित ठेवण्यासाठी पुरेसे तारण-संरक्षण मागू शकतात. वरील १(ग) मध्ये दिल्याप्रमाणे, जेथे ऑडिटर्स नेमता येत नाहीत अशा बाबतीत १५ दिवसांच्या निकासीच्या रकमेच्या सममूल्य असलेली, कोणत्याही परिवर्तनीय मुद्रेतील रोख ठेव किंवा त्या मूल्याची, एखाद्या

आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेची हमी, तारण संरक्षण म्हणून घेतली जावी. ही ठेव एडी वर्ग-१ बँकेच्या नावे असावी व त्यावरील व्याज, ती ठेवणाऱ्या विनिमय गृहाला, बाजार संबंधित दराने देय असावे. ठेवीची रक्कम व हमी ह्यांचे नियमितपणे पुनरावलोकन केले जावे आणि अशा तारणामुळे निकासींना पुरेसे संरक्षण मिळत असण्याबाबत एडी वर्ग-१ बँकांनी खात्री करुन घ्यावी.

**(२) नॉन-डीडीए कार्यरीत**

(अ) डीडीए खाते ठेवणे व वर दिल्याप्रमाणे ऑडिटर्सची नेमणुक करणे ह्यास पर्याय म्हणून, बँका नॉन-डीडीए कार्यरीतीचा अवलंब करु शकतात.

(ब) ह्या नॉन-डीडीए रीतीखाली, विनिमय गृहे, त्यांच्या एडी वर्ग १ बँकांमध्ये असलेल्या व्होस्ट्रो खात्यात, नियमितपणे, त्यांनी दिलेल्या, युसडीमधील एकूण ड्राफ्ट्सच्या विरुध्द, एडी वर्ग १ बँकांकडून विकत घेतलेला रुपये निधी जमा करतात आणि त्या एडी वर्ग-१ बँकांना, निकासी व असा निधी जमा केल्याची साप्तहिक विवरणपत्रे पाठवितात.

(क) नॉन-डीडीएसाठी तारण-संरक्षण – कार्यवाहीची तीन वर्षे पूर्ण न केलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणत्याही परिवर्तनीय चलनामधील रोख ठेवीच्या स्वरुपात किंवा सात दिवसांच्या निकासींच्या रकमेएवढी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेकडील हमी तारण-संरक्षण म्हणून घेण्यात यावी. तीन वर्षांची यशस्वी वाटचाल केली असलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणतेही तारण विहित करण्यात आलेले नाही. नॉन-डीडीए कराराखाली, कोणत्याही परिवर्तनीय चलनामधील रोख ठेव किंवा (१०) दिवसांच्या निकासी एवढ्या रकमेची हमी एखाद्या आंतरराष्ट्रीय बँकेकडून, तारण-संरक्षण म्हणून विनिमय गृहाकडून घेण्यात यावी. याशिवाय, विनिमय गृहाच्या पुस्तकांची तपासणी करण्याबाबत, बँकेचे स्वतःचे कर्मचारी नेमण्याच्या हक्कासंबंधाने काही निर्बंध असल्यास ( कुवेतमधील विनिमय गृहांबाबत होते त्याप्रमाणे ) कोणत्याही परिवर्तनीय चलनामधील रोख ठेव/एखाद्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेने दिलेली १५ दिवसांच्या निकासी रकमेच्या सममूल्य रक्कमेची हमी घेण्यात यावी. ही ठेव एडी वर्ग १ बँकेच्या नावे असावी व त्यावरील बाजार दराने असलेले व्याज, ती ठेव ठेवणाऱ्या विनिमय गृहाला देय असावे. ठेवीची रक्कम व हमी ह्यांचे नियतकालिक पुनरावलोकन केले जावे ] आणि एडी वर्ग १ बँकांनी, ठेवलेले तारण निकासींसाठी व मूल्यांकन केलेल्या डेबिटसाठी पुरेसे असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

**(३) जलद प्रेषण कार्यरीत**

(अ) पुढील गेष्टी केल्या असल्यास, जलद प्रेषण कार्यरीतीखाली, एडी वर्ग १ बँकांना आरडीए करण्याची परवानगी आहे.

(१) स्विफ्ट किंवा इंटरनेटमार्फत, विनिमय गृहाने, नाव, पत्ता इत्यादींच्या संपूर्ण सूचना पाठविल्या आहेत. .

(२) प्रदान सूचना देण्यापूर्वी बऱ्याच आधी, विनिमय गृहाने, एडी वर्ग १ बँकेतील नोस्ट्रो खात्यामार्फत रुपये खात्यात निधी जमा केला आहे.

(३) माहिती पडताळून पाहिल्यावर आणि विनिमय गृहाच्या व्होस्ट्रो खात्यात शिल्लक उपलब्ध असल्यास, एडी वर्ग - १ बँकेने लाभार्थीच्या नावे ड्राफ्ट दिला आहे किंवा त्याच्या खात्यात जमा केला आहे.

(४) लाभार्थीचे केंद्र कोणतेही असले तरी, विनिमय गृह, प्रदानाच्या सर्व सूचना, एडी वर्ग-१ बँकेच्या, खाते असलेल्या शाखेकडेच पाठवील.

(५) खात्यात स्पष्ट असा निधी असल्याशिवाय ती शाखा कोणतेही प्रदान करणार नाही.

(६) विनिमय गृहातून होणाऱ्या अशा हस्तांतरणांची संख्या व एकूण रक्कम ह्यासंबंधीची तारीखवार माहिती एडी वर्ग १ बँक मिळवील.

(७) जलद प्रेषणाची सुविधा, विद्यमान रुपये निकासी व्यवस्थेला जेथे देण्यात आली आहे तेथे, विनिमय गृह, रिझर्व बँकेच्या पूर्व मंजूरीने एक वेगळे रुपये खाते उघडील आणि ह्या खात्यात स्पष्ट निधी असल्याशिवाय कोणत्याही प्रदान सूचना देणार नाही. तथापि, जेथे, डीडीए/नॉन डीडीए कार्यरीतींखाली विद्यमान निकासी व्यवस्था समाधानकारक आहेत तेथे, एडी वर्ग १ बँक, रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी नसतानाही, त्या विनिमय गृहाला, जलद प्रेषणाची सुविधा देऊ करील. मात्र, त्यासाठी नेहमीच्याच अटी व शर्ती लागु असतील व विनिमय गृहाकडून आवश्यक ते सर्व कागदपत्र मिळाले असले पाहिजेत. तथापि, अशा बाबतीत रिझर्व बँकेला ताबडतोब कळविले जावे.

(ब) जलद प्रेषण व्यवस्थेसाठी तारण संरक्षणः कार्यवाहीची तीन वर्षे पूर्ण न केलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणत्याही परिवर्तनीय चलनामधील रोख ठेवीच्या स्वरुपात किंवा सात दिवसांच्या निकासींच्या रकमेएवढी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेकडील हमी तारण-संरक्षण म्हणून घेण्यात यावी. तीन वर्षांची यशस्वी वाटचाल केली असलेल्या विनिमय गृहांसाठी, कोणतेही तारण विहित करण्यात आलेले नाही. ह्याशीवाय, ते विनिमय गृह, एडी वर्ग-१ बँकेकडे, कोणत्याही परिवर्तनीय चलनामधील रोख ठेव किंवा एक दिवसाच्या निकासी एवढ्या रकमेची आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेचे हमी देईल. ही ठेव एडी वर्ग १ बँकेच्या नावे असावी व त्यावरील बाजार दराने असलेले व्याज, ती ठेव ठेवणाऱ्या विनिमय गृहाला देय असावे. ठेवीची रक्कम व हमी ह्यांचे नियतकालिक पुनरावलोकन केले जावे.

**विभाग ४**

**<u>विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था</u>**

एडी वर्ग १ बँका, डीडीए किंवा नॉन-डीडीए व्यवस्थेखाली, त्यांच्याबरोबर रुपये निकासी व्यवस्था ( आरडीए ) असलेल्या विनिमय गृहांबरोबर विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांचे करार करु शकतात, मात्र त्यासाठी रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी व पुढील अटी आवश्यक आहे.

(अ) विनिमय गृहे एडी वर्ग १ बँकांच्या `अ' किंवा `ब' वर्गाच्या शाखांवर, कोणत्याही परिवर्तनीय विदेशी चलनातील ड्राफ्ट्स काढू शकतात. कोणत्याही वर्ग `क'शाखेला ह्या व्यवस्थेत घेण्यास परवानगी नाही.

(ब) विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था रुपये निकासी व्यवस्थेपासून वेगळी ठेवण्यात येईल.

(क) खाते ठेवणाऱ्या शाखेत, त्या विनिमय गृहाचे एक वेगळे विदेशी मुद्रा निकासी खाते उघडले जाईल. अशा ड्राफ्ट्सचे प्रदान, विनिमय गृहाने ठेवलेल्या ह्या खात्यात डेबिट करुन केले जाईल – एडी वर्ग १ बँकेतील नोस्ट्रो खात्यातून नव्हे.

(ड) कोणत्याही दिवशी, विनिमय गृहाने काढलेल्या ड्राफ्ट्सची एकूण रक्कम, ड्रॉवी बँकेच्या नोस्ट्रो खात्यात, उशीरात उशीरा पुढील कामाच्या दिवसाची अखेर होण्याच्या आत जमा केली जावी.

(ई) ड्रॉवी एडी वर्ग १ बँकेच्या, खाते ठेवणाऱ्या शाखेने, तिच्या नोस्ट्रो खात्यात क्रेडिट झाल्याबाबत दुजोरा मिळाल्यावर, त्या विनिमय गृहाच्या विदेशी मुद्रा नोस्ट्रो खात्यात क्रेडिट करावे.

(फ) विदेशी मुद्रा खात्यांमध्ये निधी उपलब्ध असल्याची खात्री एडी वर्ग बँकांनी सदोदित करुन घ्यावी.

(ग) ही व्यवस्था डीडीए कार्यरीतीखाली असल्यास, विनिमय गृहाने, पुढील कामाच्या दिवसाची अखेर होण्यापूर्वी, खाते असलेल्या शाखेला, इलेक्ट्रॉनिक रितीने, विदेशी मुद्रेत काढलेल्या ड्राफ्ट्सची संख्या व एकूण रक्कम कळवावी. डीडीए कार्यरीतीखाली, अशी माहिती वारंवार ( आठवड्यातून दोनदा ) मिळवावी.

(ह) तारण-संरक्षण – विनिमय गृहांनी ड्रॉवी एडी वर्ग १ बँकांकडे किमान युएसडी ५०,००० ची ठेव ठेवावी. बँकांकडे ठेवलेल्या अशा ठेवींची पर्याप्तता, ह्या व्यवस्थेखालील कार्यरीतींवर आधारित, दर सहा माहिन्यांनी केलेल्या पुनरावलोकनात पडताळून पाहिली जावी आणि आवश्यक असल्यास विनिमय गृहांनी ठेवीची रक्कम वाढवावी. एडी वर्ग १ बँकांनी ह्या ठेवीवर सुयोग्य दराने व्याज द्यावे.

(आय) एडी वर्ग १ बँकांना, विदेशी मुद्रा ड्राफ्ट निकासी व्यवस्थेखाली व भारतामधील रुपये निकासी व्यवस्थेच्या नॉन-डीडीएखाली, आवश्यक असलेली ठेवीची रक्कम, ते खाते ठेवणाऱ्या शाखेत ठेवण्यास परवानगी आहे.

**विभाग – ५**

**संकीर्ण तरतुदी**

(१) रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांखाली कोणताही व्यवहार करण्यापूर्वी, एडी वर्ग - १ बँकांनी, लागु असेल त्यानुसार, तुमचा ग्राहक जाणा ( केवायसी )/अँटी मनी लॉंडरिंग ( एएमएल )/दहशतवादाला अर्थ सहाय्य करण्याशी सामना ( सीएफटी ) बाबतच्या, रिझर्व बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

(२) लाभाथाअना प्रदान करण्यापूर्वीच, विनिमय गृहाच्या व्होस्ट्रो खात्यात निधी जमा झाला असल्याची खात्री करुन घेण्यासाठी, एडी वर्ग-१ बँकांनी, त्यांच्या कॉंकरंट ऑडिटमध्ये, रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांचा समावेश करावा.

(३) एडी वर्ग - १ बँकांनी, रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांमार्फत मिळालेल्या प्रेषणांच्या बाबतीत “ड्यु डिलिजन्स”ठेवावे व त्यामुळे, अँटी मनी लॉंडरिंग मानकांसंबंधीच्या विनियमांचे काटेकोर पालन केले जाईल. एडी वर्ग - १ बँकांनी, विनिमय गृहांकडून, त्यांच्या ऑडिटर्सनी प्रमाणित केलेला, वार्षिक अनुपालन अहवाल मागवावा की; ती गृहे त्यांच्या देशातील केवायसी/एएमएल/सीएफटी विनियमांचे पालन करीत आहेत.

(४) रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांच्या कार्यकृतींवर सतत नजर ठेवून, एडी वर्ग - १ बँकांनी त्यातील अवास्तव लक्षणांबाबत रिझर्व कळवीत रहावे.

(५) एडी वर्ग - १ बँकांनी खात्री करुन घ्यावी की, विनिमय गृहांचे मुदत संपलेल्या परवान्यांचे नूतनीकरण केले जाईल आणि त्यांच्या सत्यांकन केलेल्या इंग्रजीमधील प्रती त्यांच्या रेकॉर्डमध्ये ठेवण्यात आल्या आहेत.

(६) विनिमय गृहांनी, त्यांच्या भारतातील बॅक ऑफिसात, त्यांच्यातर्फे निकासी निदेश देणे, स्टॉप पेमेंट ह्यासारख्या कार्यांसाठी कोणत्याही सेवादात्याबरोबर करार करु नये आणि एडी वर्ग - १ बँकांनाही अशा सेवादात्यांच्या सूचनांवर कार्यवाही करु नये. तथापि, विनिमय गृहे भारतात बॅक ऑफिसे व संपर्क कार्यालये स्थापन करु शकतात आणि रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेऊन, ड्राफ्ट्सची, छपाई, प्रदान निदेश देणे, स्टॉप पेमेंट सूचना ह्यासारख्या बॅक ऑफिस कार्यकृती अशा संपर्क कार्यालयांद्वारे केल्या जाऊ शकतात.

(७) नावे व घटना बदलल्या असलेल्या विनिमय गृहांच्या लेखा ठेवण्यापूर्वी एडी वर्ग - १ बँकांनी रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घ्यावी.

**विभाग – ६**

**<u>अंतर्गत नियंत्रण व लेखांवर देखरेख</u>**

(१) विद्यमान सूचनांनुसार, अंतर्गत नियंत्रणे व लेखांवर देखरेख ठेवणारी सुयोग्य प्रणाली एडी वर्ग १ बँकांनी सुरु करावी. विनिमय गृहांबाबतचे व्यवहार हे सर्वदा केवळ क्रेडिट धर्तीवरच केले जावेत व खातेदारांना ओव्हरड्राफ्ट दिला जाऊ नये..

(२) **विनिमय गृहांच्या व्होस्ट्रो खात्यांचे स्वयं-परीक्षण :-** अनुभवी अधिकाऱ्यांद्वारा, विनिमय गृहांच्या व्होस्ट्रो खात्यांचे सहामही धर्तीवर परीक्षण करणे एडी वर्ग - १ बँकांसाठी आवश्यक आहे. असे परीक्षण अहवाल, एडी वर्ग-१ बँकांमधील सक्षम प्राधिकरणांनी काळजीपूर्वक अभ्यासावेत, त्यामुळे त्वरित सुधारणा करावयाची कारवाई करता येईल. ह्यावरील निरीक्षणे, संचालक मंडळाला सादर केलेल्या लेखा-पुनरावलोकनामध्ये समाविष्ट करता येतील.

## भाग ब

<u>रिपोर्ट्स/विवरणपत्रे</u>

(१) **विवरणपत्र अ** : हे विवरणपत्र ( <u>जोडपत्र</u> २ मध्ये दिल्यानुसार ), विनिमय गृहांच्या रुपये/विदेशी मुद्रा व्होस्ट्रो खात्यांमधील कार्यकृतींची माहिती मिळविण्यासाठी तयार करण्यात आले असून ते विनिमय गृहानुसार दरमहा तयार करावयाचे आहे. ह्या खात्यात असलेले निधी पाईपलाईनमध्ये अंदाजे असलेल्या डेबिट्ससाठी पुरेसे आहेत काय हे समजण्यासाठी ते काळजीपूर्वक तपासले जावे. एडी वर्ग - १ बँकांमधील वरिष्ठ व्यवस्थापनांनी पाईपलाईनमधील माहिती काढून स्वतःच मर्यादा ठरवाव्यात. ठरविल्या अशा मर्यादांचे अनुपालन केल्याबाबत वरिष्ठ व्यवस्थापनाला दर तिमाहीत कळविले जावे.

(२) **विवरणपत्र ब**: : हे एकत्रित केलेले सहामाही विवरणपत्र असून ( जोडपत्र ३ ) ते बंद होणाऱ्या/बंद होण्यात असणाऱ्या विनिमय गृहांच्या रुपये/विदेशी मुद्रा व्होस्ट्रो खात्यांची स्थिती दर्शविते.

(३) **विवरणपत्र क:** हे एक मासिक विवरणपत्र असून (जोडपत्र ४ ) ते, गोळा केलेले उत्पन्न/रक्कम व अतिरिक्त तारणे धारण करण्यासाठी ( डीडीए/नॉन डीडीए कार्यरीतींखाली ) भारतीय बँकांच्या विदेशातील शाखांमध्ये विनिमय गृहांच्या खात्यासंबंधीची माहिती देते.

(४) **विवरणपत्र ड :** हे मासिक विवरणपत्र ( जोडपत्र ५ ) विनिमय गृहांच्या विदेशी मुद्रा व्होस्ट्रो खात्यांमधील कार्यकृतींची माहिती देते.

***<u>सूचना</u> :- विवरणपत्र अ ते ड रिझर्व बँकेकडे सादर करावयाची आवश्यकता नसली तरी एडी वर्ग - १ बँकांनी ती तयार करावीत आणि विहित केलेल्या नियतकालिकतेने तपासणी करावी. संबंधित विवरणपत्रे/रिपोर्ट, संबंधित उच्च व्यवस्थापनाकडे सादर करावीत व त्यासोबत योग्य त्या स्पष्टीकरणात्मक टीपा व आवश्यक तेथे केलेले/करत असलेले उपाय द्यावेत.***

(५) **विवरणपत्र ई** - हे विवरणपत्र (**जोडपत्र ६**), दर तिमाहीमध्ये मिळालेली एकूण प्रेषणे व धंद्याची वाढ समजण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे तिमाही विवरणपत्र प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, विदेशी मुद्रा विभाग, केंद्रीय कार्यालय, फोरेक्स मार्केट विभाग, मुंबई - ४०० ००१ ह्यांचेकडे संबंधित तिमाही नंतरच्या पुढील महिन्याच्या १५ तारखेपूर्वी सादर करावयाचे आहे.

(६) **वार्षिक पुनरावलोकन :-** एडी वर्ग १ बँकांनी, प्रत्येक वर्षी, जून ३० पर्यंत, मागील वर्षाच्या जानेवारी १ ते डिसेंबर ३१ पर्यंतच्या कालासाठी असलेली व त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेली, रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्थांखाली ( आरडीए/एफसीवाय डीए ) विनिमय गृहांनी ठेवलेल्या व्होस्ट्रो खात्यांवरील वार्षिक रिव्ह्यु नोट तयार करुन ती प्रभारी महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, विदेशी मुद्रा विभाग, केंद्रीय कार्यालय,

फोरेक्स मार्केट विभाग, मुंबई - ४०० ००१ ह्यांचेकडे सादर करावी. ह्या रिव्ह्यु नोटमध्ये पुढील सारख्या बाबी असाव्यात (अ) त्या विनिमय गृहाची कर्ज-क्षमता ( वित्तीय विवरणपत्रे व मार्केट रिपोर्टवर आधारित ) (ब) विनिमय गृहांच्या परवान्यांची वैधता त्यांच्या स्वदेशात विनिमय गृहांनी केवायसी/एएमएल/सीएफटी बाबतच्या मार्गदर्शक तत्वांचे केलेले अनुपालन (क) व्यवहार,प्रसंग, वाद इत्यादींमुळे एडी वर्ग - १ बँकांना झालेला ( असल्यास ) वित्तीय तोटा (ड) प्रत्येक व्यवस्थेखालील व्यावहारिक उलाढाल (ई) व्होस्ट्रो खात्यांबाबत निधींच्या व्यवस्था (फ) त्या विनिमय गृहाच्या खात्याची सहामाही तपासणी (ग) पर्यवेक्षण ( त्या खात्यामधील व्यवहारांवर देखरेख ठेवणारी प्रणाली ) (ह) अंतर्गत नियंत्रण व जोखीम व्यवस्थापन प्रणाली (आय) ओव्हरड्राफ्ट व गोळा केलेले व्याज वार्षिक रिव्ह्यु नोटबरोबर, संचालक मंडळाने दिलेल्या सूचनांचा सारांशही रिझर्व बँकेकडे पाठवावा. वार्षिक रिव्ह्यु नोट पाठवितेवेळी, पुढीलप्रमाणे तपशीलही पाठवावेत (अ) एडी वर्ग - १ बँकेच्या, त्या विनिमय गृहाशी असलेल्या निकासी व्यवस्थांचा ( डीडीए/नॉन डीडीए/जलद प्रेषण ) तपशील, आरबीआयने दिलेल्या मंजुरीची व व्होस्ट्रो खाते उघडल्याची तारीख (ब) निकासी व्यवस्था समाप्त केल्याच्या तारखा ( समाप्त न करता येणाऱ्या निकासी व्यवस्थांसह ) आणि (क) प्रत्येक व्यवस्थेखालील ड्रॉवी शाखांची संख्या.

**जोडपत्र १**

**( विभाग १, परिच्छेद २(अ) पहा )**

<u>विनिमय गृहाबरोबर रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था सुरु करण्यासाठी मिळवावयाचा अर्ज</u>

(अ) विनिमय गृहाबरोबर रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था सुरु करण्यासाठी मिळवावयाचा अर्ज हा ( खाली दिलेल्या ) नमुन्यात पूर्ण करुन प्रभारी महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, विदेशी मुद्रा विभाग, केंद्रीय कार्यालय, फोरेक्स मार्केट विभाग, मुंबई - ४०० ००१ ह्यांचेकडे सादर करावी. ह्या अर्जावर त्या एडी वर्ग - १ बँकेच्या महाव्यवस्थापक ( किंवा सममूल्य दर्जाचा अधिकारी ), आंतरराष्ट्रीय बँकिंग विभाग/विदेशी विभाग ह्याची सही असावी.

(ब) **कागदपत्र**

ह्या अर्जासोबत एडी वर्ग - १ बँकेने पुढील कागदपत्र जोडावेत :

(१) ते विनिमय गृह असलेल्या देशातील सेंट्रल /- /अन्य पर्यवेक्षणीय प्राधिकरणाने दिलेल्या परवान्याची (इंग्रजीमधील प्रत)

(२) त्या विनिमय गृहाच्या देशातील म्युनिसिपल प्राधिकरणाने आणि/किंवा अन्य सरकारी विनियामक/नियंत्रक प्राधिकरणाने दिलेल्या परवान्यांच्या प्रमाणित प्रती (युएईमधील विनिमय गृहांना लागु )

(३) त्या विनिमय गृहाने स्वदेशात केवायसी/एएमएल/सीएफटी बाबतच्या नॉर्म्सचे अनुपालन केले असल्याबाबत चार्टर्ड अकाऊंटंटचे प्रमाणपत्र

(४) संबंधित देशातील (अ) भारतीय वकिलात आणि (ब) त्या विनिमय गृहाचे दोन बँकर्स ह्यांनी दिलेले गोपनीय मत/अहवालाच्या प्रमाणित प्रती

(५) त्या विनिमय गृहाच्या मागील तीन वर्षांची ऑडिटेड ताळेबंद व नफा तोटा लेखा विवरणपत्रे

(६) अशी व्यवस्था सुरु करण्यासाठी, एडी वर्ग - १ बँकेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत

(७) रुपये/विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था सुरु करण्याच्या ( तारणाच्या तरतुदीसह ) प्रस्तावाबाबत, त्या विनिमय गृहाने दिलेल्या पत्राची प्रत

**भाग १ – अर्जदार बँक व तिच्या विद्यमान व्यवस्थांचा (असल्यास) तपशील**

| | | |
|---|---|---|
| (१) | अर्जदार बँकेचे नाव | |
| (२) | विद्यमान व्यवस्था<br>(i) विनिमय गृहाचे ( ईएच ) नाव<br>(ii) कधीपासून<br>(iii) ड्रॉवी शाखांची संख्या<br>(iv) मागील तीन कॅलेंडर वर्षांसाठी धंद्याची उलाढाल | |
| ३(अ) | बहुविध ईएच निकासी व्यवस्था असलेल्या शाखांची संख्या | |
| ३(ब) | ह्या शाखांमध्ये सुरु केलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणाली पुरेशा असण्याबाबत माहिती/मते द्यावीत ( जरुर वाटल्यास एक पृष्ठ जोडावे ) | |
| (४) | गेल्या पाच वर्षांमध्ये ( एप्रिल – मार्च ) सोसलेले आर्थिक तोटे ( असल्यास ) –<br>(१) वर्ष<br>(२) ईएचचे नाव<br>(३) तोट्याची रक्कम<br>(४) तोट्याचा तपशील<br>(५)आरबीआयकडे सादर केल्याचे आणि राईट ऑफ करण्यासाठी आरबीआयने दिलेली परवानगीचे संदर्भ क्रमांक व तारखा | |
| (५) | तडजोड प्रलंबित असलेले ईएच बरोबर असलेले वित्तीय वाद –<br>(१) ईएचचे नाव<br>(२) तोट्याची अंदाज रक्कम<br>(३) तोट्याचा तपशील<br>(४) आरबीआयकडे सादर केलेल्या रिपोर्टाचा संदर्भ क्रमांक व तारीख | |
| (६) | अंतर्गत ऑडिटर्स, आरबीआयचे निरीक्षक व विदेशातील ऑडिटर्स ह्यांनी केलेल्या तपासणीदरम्यान, विद्यमान निकासी व्यवस्थांमध्ये आलेल्या अनियमितांचा, एईच निहाय सारांश देऊन त्याबाबत योजलेले उपाय द्यावेत. | |

**भाग – २ – प्रायोजित निकासी व्यवस्थांसाठी विनिमय गृहांचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| १(अ) | बँक आरडीए सुरु करु इच्छित असलेल्या विनिमय गृहाचे नाव व पत्ता | |
| (ब) | ईएचच्या संस्थापनाची तारीख | |
| (क) | त्या ईएचच्या गटातील अन्य कंपन्यांची माहिती ( म्हणजे – नाव, व्यवस्थापकीय नियंत्रण, साधने व पत इत्यादी ) द्यावी | |
| (२)(अ) | भारतामधील अन्य एखाद्या बँकेबरोबर त्या ईएचचा कार्यकारी आरडीए आहे काय ? | |
| (ब) | होय असल्यास त्या बँकेचे/बँकांची नाव/नावे द्यावीत. | |
| | (३) ईएचच्या व्यवस्थापकीय रचनेचा तपशील द्यावा<br>(अ) ईएचचा ( कंपनी, संस्था, संयुक्त उद्योग इ. ) दर्जा<br>(ब) व्यवस्थापनाचा भार कोणावर आहे<br>(क) त्या ईएचच्या प्रायोजकांचे नाव, राष्ट्रीयत्व व व्यवसाय<br>(ड) भांडवल-धारणाचा साचा<br>(ई) अर्जदार बँकेची त्या ईएचमध्ये गुंतवणुक काय ? संपूर्ण तपशील द्यावा<br>(फ) अर्जदार बँकेची त्या ईएचच्या व्यवस्थापनात काही भूमिका असेल काय ? तपशील द्यावा | |
| (४) | मागील तीन कॅलेंडर वर्षांमध्ये ईएचला झालेला नफा/सोसलेला तोटा | |
| (५) | संबंधित देशाची सेंट्रल बँक/पर्यवेक्षणीय प्राधिकरणाने दिलेल्या परवान्याचा तपशील -<br>(अ) परवाना क्रमांक<br>(ब) दिल्याची तारीख<br>(क) वैधता कालावधी<br>(ड) असल्यास विशेष अटी._ | |
| (६) | म्युनिसिपल प्राधिकरणांनी आणि/किंवा इतर सरकारी नियंत्रक/विनियामक प्राधिकरणाने दिलेल्या परवान्यांचा तपशील ( युएईमधील ईएचना लागु ) –<br>(अ) परवाना क्रमांक<br>(ब) दिल्याची तारीख<br>(क) वैधता कालावधी<br>(ड) असल्यास विशेष अटी. | |

| | | |
|---|---|---|
| (७) | पुढील संस्थांनी नोंदविलेले गोपनीय मत —<br>(अ) त्या देशातील भारतीय वकिलात<br>(ब) ईएचचे बँकर्स<br>(१) ......<br>बँकरचे नाव<br>(२) ......<br>बँकरचे नाव | |
| (८) | अर्जदार बँकेचे पुढील बाबतीत समाधान झाले आहे काय ?<br>(अ) ईच सांभाळणारी कंपनी/संस्था/लोक ह्यांची सक्षमता<br>(ब) त्या ईएचच्या शेअर धारकांची आर्थिक शक्ती<br>(क) त्या ईएचची आर्थिक शक्ती<br>(ड) ड्राफ्ट्स देण्याबाबत त्या ईएचमध्ये कार्यरत असलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणाली | |
| (९) | ईएचबरोबर ठरविलेल्या तारण व्यवस्थांचा तपशील द्यावा ( उदा. ठेवीची, बँक हमीची रक्कम इत्यादी ). | |

**भाग ३ — प्रायोजित व्यवस्थेची माहिती :-**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रायोजित व्यवस्थेची माहिती/वर्णन — | |
| २ (अ) | आरडीए सुरु करण्याचे कारण | |
| (ब) | व्यावसायिक उलाढालीचे प्रक्षेपण ( मासिक प्रक्षेपणांचे आकारमान द्यावे ) | |
| (३) | प्रायोजित आरडीए चालविण्याची रीत ( डीडीए/नॉन डीडीए/स्पीड ) | |
| (४) | लेखा ठेवणाऱ्या शाखेचे नाव व पत्ता | |
| (५) | प्रायोजित आरडीएमध्ये समाविष्ट करावयाच्या ड्रॉवी शाखांची संख्या | |
| (६) | ७ दिवसांच्या प्रक्षेपित निकासींच्या सममूल्य रकमेचे अतिरिक्त तारण-संरक्षण देण्यास ती ईएच तयार आहे काय ? ( कार्यकृतींची ३ वर्षे पूर्ण न केलेल्या ईएचसाठी लागु ) | |
| (७) | अर्जाच्या पुष्टयर्थ बँक देऊ इच्छित असलेली अन्य माहिती | |

आम्ही येथे प्रमाणित करीत आहोत की -

(१) वरील ईएचची साधने व पत -- -- विचारात घेऊन, आम्ही ............... बरोबरच्या प्रायोजित व्यवस्थेबाबत विचार केला असून, ह्या ईएचशी संबंधित असलेल्या व्यक्ती/संस्था/कंपन्यांची अधिकारपत्रे व क्षमता ह्याबाबत आमचे पूर्णपणे समाधान झाले आहे.

(२) इतर ईएच बरोबर आधीच निकासी व्यवस्था असलेल्या आणि वरील ईएच बरोबर, म्हणजे
... बरोबर अशा प्रायोजित व्यवस्थेखाली येणाऱ्या आमच्या शाखांजवळ आणखी एका ईएचकडून येणारा व्यवसाय हाताळण्याचे पुरेसे ज्ञान व क्षमता आहे.

(३) आमच्याकडे सुयोग्य अशी अंतर्गत नियंत्रण व जोखीम व्यवस्थापन प्रणाली कार्यरत असून त्या समाधानकारक कार्य करीत आहेत.

(४) आमची माहिती व विश्वासानुसार वर दिलेला तपशील सत्य व खरा आहे.

( )
महाव्यवस्थापक
पत्ता,

स्थळ

दिनांक.

**जोडपत्र – २**

( विभाग, परिच्छेद १ पहा )

विवरणपत्र अ

प्राधिकृत डीलर वर्ग १ चे नाव

पूर्ण पत्ता

विनिमय गृहाचे नाव ......

**महिन्यातील खात्यामधील कार्यकृतीचा तपशील**

(१) .... च्या सुरुवातीला खात्यामधील खुलती शिल्लक (क्रे/डे) : ____________________

(२) महिन्यामधील एकूण क्रेडिट्स : ____________________

(३) महिन्यामधील एकूण डेबिट्स : ____________________

(४) .... रोजी बंद शिल्लक ( क्रे/डे ) : ____________________

(५) पाईपलाईनमधील डेबिट्सचे अदमासे मूल्य ( वरील बाब
३ अनुसार किंवा वार्षिक डेबिट समेशनने काढलेली सरासरी
१५ दिवसांची निकासी ) : ______________________________

(५)(अ) मागील एका आठवड्यात, प्रिंसिपाल
एनकॅशिंग शाखा/कार्यालये ह्यांनी केलेल्या प्रत्यक्ष प्रदानाची
रक्कम ( एस्टिमेटेड पाईपलाईनमध्ये जोडण्यासाठी ) : ____________________

(६) बँकेने तारण म्हणून किंवा डीडीए कार्यरीतीखाली विदेशात
ठेवलेले निधी : ____________________

(७) वरील बाब ५ साठी, खात्यामधील शिल्लक/तारण
ह्यातील आधिक्य/तूट : ____________________

(८) बँकेने विनिमय गृहाला केलेल्या रुपयांच्या विक्रीच्या संदर्भात, त्या महिन्यात, खात्यामध्ये केलेल्या विशिष्ट अशा प्रत्येक विदेशी क्रेडिट विरुध्द, विनिमय गृहाकडून वसुल केलेल्या सममूल्य विदेशी मुद्रेची रक्कम द्यावी. दिनांक : वसुल केलेली विदेशी मुद्रेची रक्कम

(अ) ह्या महिन्यात आमच्या प्रदान करणाऱ्या शाखांकडून मिळालेल्या सर्व प्रदान सूचना विनिमय गृहाच्या रुपये खात्यांमध्ये डेबिट करण्यासाठी हिशेबात घेतल्या गेल्या आहेत.

(ब) विनिमय गृहाच्या खात्यात रुपये-निधी क्रेडिट करण्यापूर्वी, आमच्या विदेशातील नोस्ट्रो खाती ठेवणाऱ्या बँकांकडून, आमच्या नोस्ट्रो खात्यात सममूल्य निधी ( विदेशी मुद्रा ) जमा केली गेल्याबाबत दुजोरा मिळाला आहे.

(क) आम्ही दुजोरा देतो की, विनिमय गृहाचे रुपये खाती ही आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार आणि संबंधित विनिमय गृहांशी केलेल्या संबंधित करारनाम्यातील अटींनुसारच काटेकोरपणे ठेवली गेली आहेत

(ड) ह्या विवरण पत्राची प्रत, आमच्या बॅंकेच्या नोस्ट्रो खात्याच्या, प्रभारी महाव्यवस्थापक, फॉरिन कॉरेस्पॉंडंट रिलेशनशिप व विभाग ह्यांचेकडे पाठविण्यात आली आहे

(ई) आम्ही दुजोरा देत आहोत की, हे विवरणपत्र सादर करतेवेळी, आमचेकडे खाती ठेवणाऱ्या आमच्या आंतरराष्ट्रीय विभागाच्या महाव्यवस्थापकाकडून आम्हाला कोणतेही विपरीत रिपोर्ट/सावधानता इशारे मिळालेले नाहीत. ह्या विवरणपत्राचे बॅंकेत अंतर्गत पुनरावलोकन केले गेले असून हे खाते, समाधानकारक रितीने चालविले जात असल्याचे
प्रमाणित केले गेल्यावरच त्यावर सही केली गेली आहे.

| | |
|---|---|
| खाते ठेवणाऱ्या शाखेचे मुख्य व्यवस्थापक | बॅंकेमधील प्रभारी महाव्यवस्थापक/<br>आंतरराष्ट्रीय कार्यकृती ह्यांची सही. |

**जोडपत्र – ३**
**( भाग ब, परिच्छेद २ पहा )**

विवरणपत्र ब

**विनिमय गृहांच्या बंद करावयाच्या/बंद करत असलेल्या खात्यांची स्थिती दर्शविणारे एकत्रीकृत विवरणपत्र ( खाते ठेवणाऱ्या कार्यालयाने आंतरराष्ट्रीय विभागामार्फत पाठवावयाचे )**

| अनुक्रमांक | विनिमयगृहाचे नाव | केंद्र/ देश | खात्यातील खुलती शिल्लक | महिन्यामधील क्रेडिट्स | महिन्यामधील डेबिट्स | बंद शिल्लक | असल्यास तारण | दिसलेली अन्य जबाबदारी | खाते अंदाजे केव्हां बंद होणार | शेरा ( म्हणजे, खाते बंद करण्याबाबतच्या पत्रव्यवहाराचा आणि स्तंभ ८ मधील बाब ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

(अ) सर्व विनिमय गृहांना खाते बंद करण्याबाबत नोटिस देण्यात आली आहे.
(ब) स्तंभ ९ मध्ये दिलेले सोडल्यास, वरील खात्यात, कोणतेही पाईपलाईन डेबिट्स किंवा वसुली करावयाच्या बाबी नाहीत.
(क) अजूनही कार्यरत असलेल्या खात्यांमधील व्यवहार, प्रत्येक विनिमय गृहाच्या शीर्षकाखाली, जोडपत्रात वेगळ्याने निर्देशित केले गेले आहेत. ( ह्यासाठी एक स्पष्टीकरणात्मक पृष्ठ जोडले जावे )
(ड) वर निर्देशित केलेली पुढील खाती, पुनरावलोकनाच्या महिन्यामध्ये बंद करण्यात आली.

मुख्य व्यवस्थापक –

खाते ठेवणाऱ्या शाखेचा
वर दिलेली सर्व खाती ही संबंधित विनिमयगृहाखाली आहेत व ती प्रलंबित करण्यात आली असून ती बंद करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे असे प्रमाणित करुन ह्या विवरणपत्रावर सही केली गेली आहे.

एडी वर्ग - १ बँकेतील, आंतरराष्ट्रीय विभाग/आंतरराष्ट्रीय कार्यकृती विभागाचा प्रभारी महाव्यवस्थापक.

**जोडपत्र - ४**

[भाग ब, परिच्छेद ३ पहा ]

विवरणपत्र क –

भारतीय बँकांच्या विदेशातील शाखांमध्ये असलेल्या, विनिमय गृहांच्या खात्यांच्या तपशीलाबाबत मासिक विवरणपत्र ( एडी वर्ग १ बँका )

एडी वर्ग - १ चे नाव

| अनुक्रमांक | खाते उघडण्याची तारीख | विनिमय गृहाचे नाव | खात्याचे स्वरुप | कशासाठी उघडले ( मुख्यालयाची प्राधिकृतता द्यावी ) | मागील महिन्याच्या अखेरीस असलेली शिल्लक | मागील महिन्याच्या अखेरीस असलेली शिल्लक | विवरणपत्राच्या महिन्याच्या अखेरीस असलेली शिल्लक | असल्यास आऊटस्टँडिंग जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

**जोडपत्र – ५**

**( भाग ब, परिच्छेद ४ पहा )**

विवरणपत्र ड

एडीवर्ग १ चे नाव –

ड्रॉवी शाखांची संख्या –

पूर्ण पत्ता –

खात्याचा प्रकार –
आरबीआयच्या मंजुरीचा क्रमांक व तारीख

विनिमय गृहाचे नाव - ......

महिन्यामधील त्या खात्यामधील व्यवहारांची माहिती.________________________________

| अनुक्रमांक | तपशील | ( युएसडी रक्कम ) | ( रक्कम जीबीपीमध्ये ) |
|---|---|---|---|
| (१) | .... च्या सुरुवातीला खात्यामधील खुलती शिल्लक (क्रे/डे) : | | |
| (२) | महिन्यामधील एकूण क्रेडिट्स : ______________________ | | |
| (३) | महिन्यामधील एकूण डेबिट्स : ____________________ | | |
| (४) | .... रोजी बंद शिल्लक ( क्रे/डे ) : __________________ | | |
| (५) | पाईपलाईनमधील डेबिट्सचे अदमासे मूल्य ( वरील बाब<br>३ अनुसार किंवा वार्षिक डेबिट समेशनने काढलेली सरासरी<br>१५ दिवसांची निकासी ) : ______________________________ | | |
| (५)(अ) | मागील एका आठवड्यात, प्रिंसिपाल<br>एनकॅशिंग शाखा/कार्यालये ह्यांनी केलेल्या प्रत्यक्ष प्रदानाची<br>रक्कम ( एस्टिमेटेड पाईपलाईनमध्ये जोडण्यासाठी ) | | |
| (६) | बँकेने तारण म्हणून किंवा डीडीए कार्यरीतीखाली विदेशात<br>ठेवलेले निधी | | |
| (७) | वरील बाब ५ साठी, खात्यामधील शिल्लक/तारण ह्यातील आधिक्य/तूट | | |

(८) (अ) ह्या महिन्यात आमच्या प्रदान करणाऱ्या शाखांकडून मिळालेल्या सर्व प्रदान सूचना विनिमय गृहाच्या रुपये खात्यांमध्ये डेबिट करण्यासाठी हिशेबात घेतल्या गेल्या आहेत.

(ब) विनिमय गृहाच्या खात्यात रुपये-निधी क्रेडिट करण्यापूर्वी, आमच्या विदेशातील नोस्ट्रो खाती ठेवणाऱ्या बँकांकडून, आमच्या नोस्ट्रो खात्यात सममूल्य निधी ( विदेशी मुद्रा ) जमा केली गेल्याबाबत दुजोरा मिळाला आहे.

(क) आम्ही दुजोरा देतो की, विनिमय गृहाचे रुपये खाती ही आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार आणि संबंधित विनिमय गृहांशी केलेल्या संबंधित करारनाम्यातील अटींनुसारच काटेकोरपणे ठेवली गेली आहेत

(ड) ह्या विवरण पत्राची प्रत, आमच्या बँकेच्या नोस्ट्रो खात्याच्या, प्रभारी महाव्यवस्थापक, फॉरिन कॉरेस्पॉंडंट रिलेशनशिप व विभाग ह्यांचेकडे पाठविण्यात आली आहे

(ई) आम्ही दुजोरा देत आहोत की, हे विवरणपत्र सादर करतेवेळी, आमचेकडे खाती ठेवणाऱ्या आमच्या आंतरराष्ट्रीय विभागाच्या महाव्यवस्थापकाकडून आम्हाला कोणतेही विपरीत रिपोर्ट/सावधानता इशारे मिळालेले नाहीत. ह्या विवरणपत्राचे बँकेत अंतर्गत पुनरावलोकन केले गेले असून हे खाते, समाधानकारक रितीने चालविले जात असल्याचे
प्रमाणित केले गेल्यावरच त्यावर सही केली गेली आहे.

खाते ठेवणाऱ्या शाखेचे मुख्य व्यवस्थापक

बँकेमधील प्रभारी महाव्यवस्थापक/
आंतरराष्ट्रीय कार्यकृती ह्यांची सही.

**जोडपत्र ६ -**

( भाग ब, परिच्छेद ५ पहा )

विवरणपत्र ई -

**..... रोजी संपलेल्या तिमाहीत, विनिमय गृहांमार्फत आलेल्या विदेशी मुद्रा दर्शविणारे विवरणपत्र ( रक्कम युएसडीमध्ये )**

| अनुक्रमांक | विनिमय गृहाचे व देशाचे नाव | शाखांची संख्या | जे मागील वर्षी डिसेंबर अखेर मिळालेली विदेशी मुद्रा | चालु वर्षी आलेली विदेशी मुद्रा | | | | मागील तिमाही व अहवालाची तिमाही ह्यामधील वाढ (+)/घट (-) | बाहेर गेलेली विदेशी मुद्रा ( रक्कम ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जानेवारी – मार्च | एप्रिल – जून | जुलै – सप्टेंबर | ऑक्टोबर – डिसेंबर | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

**टीपा** – (अ) स्तंभ ५ ते ८ मध्ये, प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यापासून सुरुवात करुन संबंधित तिमाहीमध्ये आलेला निधी दाखविला जावा. ह्या आकड्यांच्या खालीच कंसामध्ये त्याच कालासाठीचा मागील वर्षाचा डेटा दिला जावा. निकासी व्यवस्थांबाबतच्या माहितीमध्ये, आरडीए व विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था ह्या दोन्हीहीमधून आलेला निधी समाविष्ट केलेला असावा.

(ब) विदेशी मुद्रा केवळ युएसडीमध्येच निर्देशित केली जावी

(क) स्तंभ (९) मध्ये, रक्कम (+) किंवा (-) अशी आणि टक्केवारीत व्यक्त केली जावी

(ड) ह्या विवरणपत्रावर, त्या बँकेच्या मुख्यालयातील, आंतरराष्ट्रीय बँकिंग विभाग/कक्षाच्या प्रमुखाची ( परंतु डीजीएमपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची ) सही असावी.

(ई) आवश्यक असेल तेथे, विभाग ३ मधील अनुक्रमांक (क),(फ),(ग),(ह),(आय) व (ज) मधील घोषणापत्रानुसार, आवश्यकतांपासून झालेल्या विचलनांची माहिती वेगळे पृष्ठ जोडून द्यावी.

कृपया दुरुस्तीसाठी केलेली कार्यवाही व सध्याची स्थिती कळवावी.

आम्ही येथे प्रमाणित करीत आहोत की, -

(१) वरील माहिती प्रत्यक्ष झालेल्या व्यवहारांवर तयार करण्यात आली असून त्यात पाईपलाईनमधील व्यवहार समाविष्ट नाहीत.

(२) पुढील कारणांमुळे, शेवटचे विवरणपत्र सादर केल्यापासून, कव्हर केलेल्या शाखांची संख्या ...... पासून ..... एवढी वाढली आहे.

(३) विदेशी मुद्रा येण्यामधील वाढ/घट ही पुढील कारणांमुळे झाली आहे.

(४) वर दिलेले आऊट फ्लो हे ...... ह्यामुळे आले असून त्यासाठी रिझर्व बँकेचे पत्र क्र. ...... दि. ...... द्वारा मंजुरी देण्यात आली आहे.

(५) अहवालाच्या तिमाहीमध्ये वरील सर्व खात्यांमध्ये क्रेडिट बॅलन्सेस होते

(६) ह्या खात्यांमधील निधी, पाईपलाईनमधील प्रक्षेपित व्यवहारांसाठी पुरेसे होते

(७) आमच्या विदेशातील शाखांनी वरील/कोणत्याही विनिमय गृहांना कोणतेही कर्ज/अग्रिम राशी दिलेल्या नाहीत

(८) आम्ही जोडपत्र २, जोडपत्र ३, जोडपत्र ४ व जोडपत्र ५ मधील अनुक्रमे `अ', 'ब', 'क', 'ड' ही विवरणपत्रे नियमितपणे सादर करीत आहोत

(९) वरील खात्यांमध्ये/कोणत्याही विनिमय गृहात, आणि/किंवा त्यामधील रुपये आणि/किंवा विदेशी मुद्रा निकासी व्यवस्था ह्यामधील कार्यकृतींमध्ये कोणतेही गैरव्यवहार आम्हाला आढळून आले नाहीत

(१०) वरील विनिमय गृहांची साधने व आर्थिक पतीवर आम्ही बारीक नजर ठेवली आहे आणि आजच्या तारखेसही ह्याबाबत रिझर्व बँकेला कळविण्यालायक कोणतीही विपरीत बाब आमच्या नजरेस आलेली नाही.

बँकेचे नाव

पत्ता

सही

नाव

हुद्दा

तारीख.

**परिशिष्ट**

**पैसे बद्लुन देण्याच्या कार्यकृतींबाबत सुचना पत्रकावरील महापरिपत्रकात एकत्रीत केलेल्या, ए पी (डिआयआर मालिका) परिपत्रकाची यादी.**

| अनु. क्र. | अधिसूचना/परिपत्रक | दिनांक |
|---|---|---|
| १ | ए.पी. (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र २८ [ ए.पी.(एफएल/ 'आरएल सिरीज) परिपत्रक क्र ०२] | ६ फेब्रुवारी २००८ |
| २ | ए.पी. (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र ११ [ ए.पी.(एफएल/ 'आरएल सिरीज) परिपत्रक क्र ०१] | २२ ऑगस्ट २००८ |
| ३ | ए.पी. (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र ३७ [ ए.पी.(एफएल/ 'आरएल सिरीज) परिपत्रक क्र ०२] | २ डिसेंबर २००८ |
| ४ | ए.पी. (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र १६ [ ए.पी.(एफएल/ 'आरएल सिरीज) परिपत्रक क्र ३] | २७ नोव्हें बर २००९ |
| ५ | ए.पी. (डिआयआर सिरीज) परिपत्रक क्र ०९ [ ए.पी.(एफएल/ 'आरएल सिरीज) परिपत्रक क्र ०१] | २९ ऑगस्ट २०११ |